# प्रेस नोट

पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना येथे दि.०९.०६.२०२५रोजी सत्र क्र- १०३ नवप्रविष्ट पोलीस प्रशिक्षणार्थी यांचा दिक्षांत संचलन कार्यक्रम पार पडला. परेड मध्ये एकूण आठ प्लाटून होते. परेड कमांडर म्हणुन नप्रपोशि/साहिल बाबुराव उराडे, मुळ घटक गडचिरोली व सेकंड ईन परेड कमांडर नप्रपोशि/सुरज मनमद सोनटक्के, मुळ घटक लातूर यांनी काम पाहिले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन **मा.श्री विरेंद्र मिश्र (भा.पो.से.) विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर** हे उपस्थित होते. तसेच विशेष उपस्थिती म्हणुन मा.श्री अजयकुमार बन्सल (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक, जालना आणि मा.श्री आयुष नोपाणी (भा.पो.से.) अपर पोलीस अधिक्षक, जालना, हे होते. प्रशिक्षणार्थी यांनी प्रमुख पाहुण्यांना मुख्य कवायत मैदानावर मानवंदना दिली. प्रमुख पाहुणे मा.श्री विरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी परेडचे निरीक्षण केले. यावेळी मा.प्राचार्य श्री अशोक बनकर यांनी सत्र क्र- १०३ मधील १२०२ प्रशिक्षणार्थी यांना शपथ दिली. त्यानंतर शिस्तबध्द परेड संचलन करण्यात आले. मा.प्राचार्य यांनी अहवाल वाचन केले. तसेच **आंतरवर्ग प्रथम**/आकाश मोहन ओवे, जि.अकोला, **द्वितीय/आ**काश ताराचंद कठाणे, जि.-अकोला, **द्वितीय**/सौरभ विलास गुरनुले जि.-चंद्रपूर व **बाहयवर्ग प्रथम**/रभुष शांताराम लांबाडे जि.गडचिरोली, **द्वितीय**/दिव्येश मधुकर पाटील जि.-नंदुरबार, **उत्कृष्ट गोळीबार**/शिवाजी मारोती सातपुते जि.-अकोला, **ऑल राऊंडर (आंतरवर्ग-+बाहयवर्ग) प्रथम**- वैभव सुनिल माळोदे जि.-अकोला, **द्वितीय**- भरत बाळकृष्ण गायकवाड, **द्वितीय**- आकाश ताराचंद कठाणे जि.-अकोला आणि साहिल बाबूराव उराडे- **सर्वोत्कृष्ट कमांड आणि ड्रील** प्राविण्य प्राप्त प्रशिक्षणार्थी यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

त्यानंतर प्रमुख पाहुणे मा.श्री विरेंद्र मिश्र (भा.पो.से.) विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रशिक्षणार्थींना सायबर क्राईम, आर्थिक गुन्हे, नविन तंत्रज्ञान याबाबत अदयावत ज्ञान घेण्याचे व पुढील नौकरीमध्ये कर्तव्य करतांना कोणत्याही आमीशाला बळी न पडता आपले कर्तव्य इमानदारीणे पार पाडण्याबाबत मार्गदर्शन केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यानंतर उपप्राचार्य (प्रशासन) विलास पाटील यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - श्रीमती अनामिका जगताप, कवायत निर्देशक यांनी केले.

कार्यक्रमासाठी जालना शहरातील उदयोजक, पत्रकार, प्रशिक्षणार्थी यांचे नातेवाईक, पोलीस प्रशिक्षण केंद्रातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमासाठी आंतरवर्ग व बाहयवर्गाचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी व वर्ग-४ चे कर्मचारी यांनी परिश्रम घेवुन कार्यक्रम सुरळित पार पाडला. सदरील कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील एकूण २८ जिल्हयातील प्रशिक्षणार्थींचे नातेवाईक व जालना शहरातील नागरिक यांनी फार मोठया प्रमाणात गदी केली होती.


महाराष्ट्र पोलीस
पोलीस
जालना






सत्र क्र. 103